बृहन्मुंबई
महानगरपालिका

**सार्वजनिक आरोग्य खाते**

विस्तारित लसटोचणी कार्यक्रम

क्र.आअ/713/विलका दि.03.06.2022

**जाहिरात**

बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत राबविण्यात येणा-या विलका कार्यालयातील कोविड-१९ लसटोचणी कार्यक्रमसाठी खालील पदे कंत्राटी तत्त्वावर भरण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने दि.03.06.2022 रोजीच्या जाहिरातीनुसार ईमेल-आयडी epimumbai@yahoo.com वर दि.06.06.2022 रोजी **दुपारी ४.००** वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | **पदनाम** व संख्या | **मानधन** | **शैक्षणिक अर्हता** |
|---|---|---|---|
| १. | प्रकल्प व्यवस्थापक -१ | रु.१०००००/- | • कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट मध्ये मास्टर्स किंवा सार्वजनिक आरोग्यातील पदवी (MPH)<br>• किंवा<br>• एमबीबीएस/बीएएमएस / बीडीएस आणि सार्वजनिक आरोग्यातील पदवी / पदविका. किंवा<br>• बी.ई अथवा कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि सार्वजनिक आरोग्यातील पदवी / पदविका किंवा जैविक विज्ञानातील मास्टर्स |

याची सविस्तर माहिती व अर्ज सहाय्यक आरोग्य अधिकारी(विलका), खोली क्र.३२, दुसरा मजला, एफ/दक्षिण, मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुं.-१२ यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल. तसेच वर नमूद केलेली पदे 'वॉक-इन-सिलेक्शन' पद्धतीने भरण्यासाठी दि.06.06.2022 रोजी **दुपारी ४.००** वाजेपर्यंत ईमेल-आयडी epimumbai@yahoo.com वर स्कॅन करुन PDF स्वरुपात पाठविण्यात यावे. निवड झालेल्या उमेदवारांना दुरध्वानीद्वारे कळविण्यात येईल.वरील नमूद पदासाठी या कार्यालयात कोविड-१९ कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उर्वरीत उमेदवारांची प्रतिक्षा यादी या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल. दि.06.06.2022 रोजी **दुपारी ४.००** नंतरचे प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
### अर्जाचा नमुना

पदाचे नाव------------------------

प्रति,
सहाय्यक आरोग्य अधिकारी (विलका),
एफ/दक्षिण, मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय इमारत,
दुसरा मजला, खोली क्र. ३२,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
परळ, मुंबई - ४०० ०१२

उमेदवाराने त्याचे अलिकडे
काढलेले पारपत्र आकाराचे
छायाचित्र लावून फोटोवर
स्वाक्षरी करावी

२.५ से.मी ३ से.मी

विलका विभागाच्या नियमित लसीकरण कार्यक्रमासाठी व कोविड-१९ या कामकाजासाठी वर नमूद केलेल्या पदाकरीता दिनांक------------- च्या जाहीरातीनुसार मी ----------------------खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) | | |
| | (ब) वडिलाचे / पतीचे संपूर्ण नाव | | |
| | (क) उमेदवाराचे लग्नापूर्वी चे संपूर्ण नाव<br>(महिला उमेदवारांच्या बाबतीत) | | |
| २ | पत्ता (पत्रव्यवहराचा)<br>घर क्रमांक/इमारतीचे नाव<br>रस्त्याचे नाव<br>विभागाचे नाव आणि शहर<br>पिन कोड नं.<br>टेलिफोन नं./<br>मोबाईल नं. | | |
| ३ | लिंग (पुरुष / स्त्री) | | |
| ४ | (अ) जन्म दिनांक | | |
| | (ब) दिनांक ______________रोजी असलेले वय --- वर्षे ---महिने ---दिवस---- | | |
| ५ | जात / पोटजात / प्रवर्ग जात<br>वैधता प्रमाणपत्राची छायांकित साक्षांकित प्रत<br>सोबत जोडावी. | | |

| ६. शैक्षणिक अर्हता: (अ) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| परिक्षेचे नाव | शालांत परिक्षा मंडळ/ विद्यापिठाचे नाव | गुणांचा तपशिल | | टक्केवारी | एस.एस.सी./ एच.एस.सी परिक्षेतील मराठी विषयातील गुण | | उत्तीर्णतेचे वर्ष |
| | | प्राप्त गुण | पैकी | | प्राप्त गुण | पैकी | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| अनुभव- | | | | | | | |

मी याअन्वये प्रतिज्ञा पूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहीरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. /त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास सार्वजनिक आरोग्य खाते माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

दिनांक:

आपला / आपली विश्वासू,
अर्जदाराची सही
अर्जदाराचे नाव

सोबत: १
२
३
४
५
६

सर्वसाधारण अटी:

१. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावा. विहित नमुन्यामधे नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे.

३. उमेदवाराने स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदाच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

४. पत्रव्यवहाराचा पत्ता संपर्क दूरध्वनी क्रमांकासह सुस्पष्ट व पूर्ण असावा.

५. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबद्दलचा तपशिल देणे आवश्यक आहे.

६. या कंत्राटी पध्दतीवरील नियुक्तीमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेतील इतर कोणत्याही पदावर नियमित तत्वावरील नेमणुकीसाठी हक्क सांगता येणार नाही.

७. निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

सही/-

कार्यकारी आरोग्य अधिकारी